| | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १२/०९/२०२२ |
| | नोंदणी दिनांक | : | १२/०९/२०२२ |
| | निकाल दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| | कालावधी | : | ०३ वर्षे ०५ महीने २९ दिवस. |

**लोणार येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

(**पिठासीन अधिकारी रमाकांत भा. हनवते**)

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – ११ मार्च, २०२६**

**नियमित फौजदारी खटला क्र. २७८/२०२२** **निशाणी क्र.८७**

CNRNo.**MHBU170007832022**

| गुन्हा नोंद क्रं. २३५/२०२२, पोलीस ठाणे, लोणार | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | : | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, लोणार |
| अभियोग पक्षातर्फे | : | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्री. आर. आर. चौधरी |
| आरोपी | : | **१. भागवत रामकृष्ण हाडे,**<br>वय ३७ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**२. रामकृष्ण उर्फ रामकिसन दत्तात्रय हाडे,**<br>वय ७४ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**३. सौ. राधाबाई रामकृष्ण हाडे,**<br>वय ६३ वर्षे, व्यवसाय – शेती / घरकाम<br>**४. सौ. भक्ती उर्फ संगिता रामकृष्ण हाडे,**<br>वय ३१ वर्षे, व्यवसाय – घरकाम, |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपी क्र. १ ते ४ रा. लोणार, ता. लोणार. जि. बुलडाणा.<br>**५. सौ. ज्ञानेश्वरी देवीदास शिंदे,**<br>वय ४३ वर्षे, व्यवसाय –घरकाम,<br>रा. सोमठाणा, ता. लोणार. जि. बुलडाणा.<br>**६. सौ. गिता पुरुषोत्तम बोंडे,**<br>वय ४२ वर्षे, व्यवसाय –घरकाम,<br>रा. व्याड, ता. रिसोड. जि. वाशिम.<br>**७. सौ. मुक्ता राम गारोळे,**<br>वय ३४ वर्षे, व्यवसाय –घरकाम,<br>रा. वरोडी, ता. मेहकर. जि. बुलडाणा. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | : | **श्री. डी. पी. मापारी** |

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०५/०८/२०२२ चे पूर्वी |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०५/०८/२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १२/०९/२०२२ |
| गुन्ह्याचा दोषारोप नोंदविल्याचा दिनांक | :– | १४/०८/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १८/०३/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | आरोपींना निर्दोषमुक्त करण्यात येते. |

# आरोपींची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भागवत रामकृष्ण हाडे | आरोपीस फौ प्र–स, १९७३ चे कलम ४१–अ प्रमाणे समजपत्रावर सोडण्यात आले. | १२/०९/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | रामकृष्ण उर्फ रामकिसन दत्तात्रय हाडे | आरोपीस फौ प्र–स, १९७३ चे कलम ४१–अ प्रमाणे समजपत्रावर सोडण्यात आले. | १२/०९/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | सौ. राधाबाई रामकृष्ण हाडे | आरोपीस फौ प्र–स, १९७३ चे कलम ४१–अ प्रमाणे समजपत्रावर सोडण्यात आले. | १२/०९/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ४. | सौ. भक्ती उर्फ संगिता रामकृष्ण हाडे | आरोपीस फौ प्र–स, १९७३ चे कलम ४१–अ प्रमाणे समजपत्रावर सोडण्यात आले. | १२/०९/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ५. | सौ. ज्ञानेश्वरी देवीदास शिंदे | आरोपीस फौ प्र–स, १९७३ चे कलम ४१–अ प्रमाणे समजपत्रावर सोडण्यात आले. | १२/०९/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | सौ. गिता पुरुषोत्तम बोंडे | आरोपीस फौ प्र–स, १९७३ चे कलम ४१–अ प्रमाणे समजपत्रावर सोडण्यात आले. | १२/०९ /२०२२ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ७. | सौ. मुक्ता राम गारोळे | आरोपीस फौ प्र–स, १९७३ चे कलम ४१–अ प्रमाणे समजपत्रावर सोडण्यात आले. | १२/०९ /२०२२ | भा.दं.वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)
सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | वैशाली भागवत हाडे | फिर्यादी | ५९ |
| २ | प्रकाश त्र्यंबकराव पोफळे | साक्षीदार | ७५ |
| ३ | सौ. प्रतिभा प्रकाश पोफळे | साक्षीदार | ७६ |
| ४ | विशाल प्रकाश पोफळे | साक्षीदार | ७७ |

### क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ३८ | दोषारोप |

| | | |
|---|---|---|
| ३. | ३९ ते ४५ | आरोपींचे निवेदन |
| ४. | ६० | फिर्याद |
| ५. | ६१ | प्रथम खबरी अहवाल |
| ६. | ८० ते ८६ | आरोपींची फौजदारी प्रक्रीया संहीता ३१३ ची जबाणी |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ११/०३/२०२६ रोजी घोषित केले)

**१.** आरोपी हे भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणेच्या दोषारोपाखाली संपरिक्षेस सामोरी जात आहेत.

**सरकारी पक्षाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे आहे.**

**२.** फिर्यादीचे लग्न आरोपी क्र.१ सोबत दिनांक ११/०४/२०१२ रोजी समाजाचे रितीरीवाजा प्रमाणे हिरडव, ता. लोणार येथे झाले. सदर लग्न संबधातुन फिर्यादीला एक ९ वर्षाचा मुलगा आहे. त्यांचे लग्न संबंध आजरोजी कायम आहे. फिर्यादी तिच्या सासरी नांदायला गेली असता, आरोपींनी तिला सुरुवातीचे दोन वर्ष चांगले वागविले. त्यानंतर आरोपी क्र.१ ते ४ हे फिर्यादीला घरातील लहान सहान कारणावरुन अपशब्द बोलत असत, तिचा अपमान करीत व म्हणत ''ही दिसायला सुंदर नाही, हीला स्वयपांक निट येत नाही, जिचे बापाने हुंडा दिला नाही, हीची फारकती घ्या, हिला सोडुन द्या'' असे बोलत. आरोपी क्र.१ हा फिर्यादीला चापटा बुक्याने मारहान करीत होता व म्हणत होता, ''तु मला पंसत नाही, मला फारकती दे, मी दुसरी बायको करतो, तु फारकती दिली नाही तर जिवाने मारीन'' अशी धमकी देत होता. तसेच फिर्यादीला मुलासोबत बोलु देत नसत. ''मुलगा आमचा आहे, तु घर सोडुन जा'' असे म्हणत. फिर्यादीला मुलगा असल्याने आज ना उदया सासरचे लोक धान्यावर येतील समजुन फिर्यादी त्रास सहन करीत होती पण ते फिर्यादीला जास्तच त्रास देत. आरोपी क्र. ५ ते ७ फिर्यादीच्या नंनदा घरी येत व फिर्यादी बद्दल चुगल्या करत व ''तु तुझे बापाचे घरुन दोन लाख रुपये घेऊन ये, तुझे पतीला नोकरी लावुन देयाला लाव'' सांगत म्हणुन आरोपींनी फिर्यादीला वडीलाकडुन दोन लाख रुपये घेऊन येण्यास सांगितले. परंतु फिर्यादीचे वडील गरीब असल्या कारणाने ते एवढी

मोठी रक्कम देऊ शकत नाही असे तिने आरोपींना सांगितले असता, आरोपींनी फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ करत. तसेच दोन लाख रुपये घेऊन येत नाही तर ''फारकती घे, तुझे नव–याला दुसरी बायको करुन देतो'' बोलत व आरोपी क्र.१ ने फिर्यादीला शिवीगाळ व मारहाण केली तसेच फिर्यादीच्या मुलाला त्याच्याकडे ठेवुन घेतले. तसेच फिर्यादीच्या अंगावरील सोन्या–चांदीचे दागिने काढुन घेतले व ''घरात राहायचे नाही, तुला जिवे मारतो अशी धमकी दिली''. त्यानंतर फिर्यादी तिच्या वडीलांना फोन केला व वडीलासोबत एकटीच माहेरी आली व माहेरीच राहते. सासरसरचे लोक तिला नांदावयाला नेत नसल्याने फिर्यादीने पोलीस स्टेशन लोणार येथे अर्ज दिला होता. तो अर्ज महीला तक्रार निवारण कक्ष पोलीस स्टेशन, बुलडाणा यांचे कडे गेला होता. तेथे फिर्यादीचा व आरोपींचा समझोता झाला नाही तसे पत्र फिर्यादीला दिले ते घेऊन फिर्यादीने पोलीस स्टेशन, लोणार येथे आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली.

**३.** फिर्यादीच्या सदर फिर्यादीवरुण पोलिस स्टेशन लोणार, येथे भा.दं.वी. चे ४९८–अ, ३२३,५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणेच्या आरोपींविरुद्ध गुन्हा क्र.२३५/२०२२ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ. श्री. अरुण खणपटे, ब.नं.१६०२, पोलीस स्टेशन, लोणार यांच्याकडे देण्यात आला.

**४.** तपासी अधिकारी श्री. अरुण खणपटे, यांनी गुन्हयाचा तपास केला. आरोपींना समजपत्रावर सोडले. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपी न्यायालयात हजर झाले. आरोपींनी जामिन मिळण्यासाठी अर्ज केला. अर्ज मंजूर झाला. त्यावरुन आरोपी आज पर्यन्त जमिनावर आहेत.

**५.** माझे पुर्वाधिकारी यांनी कलम २०७ फौजदारी प्रक्रिया संहिताची पूर्तता करून, आरोपींविरुद्ध भा. दं. वि. चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप निश्चित केला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे कथन करून संपरीक्षेची मागणी केली. दोषारोप निशाणी क्र.३८ वर असून आरोपींचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र.३९ ते ४५ वर नोंदविले आहे.

**६.** अभियोग पक्षातर्फे फिर्यादी वैशाली भागवत हाडे (सा.क्र.१–नि.क्र.५९), प्रकाश त्र्यंबकराव पोफळे (सा.क्र.२–नि.क्र.७५), सौ. प्रतीभा प्रकाश पोफळे, (सा.क्र.३–नि.क्र.७६) व विशाल प्रकाश पोफळे, (सा.क्र.४–नि.क्र.७७) यांचा पुरावा नोंदविला आहे.

**७.** पटलावर आलेल्या पुराव्यानुसार आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणेचा जबाब निशाणी क्र. ८० ते ८६ वर नोंदविण्यात आला. त्यात आरोपींनी खोटी केस दाखल करुन खोटे पुरावे दिल्याचे कथन केले आहे.

**८.** सहाय्यक सरकारी विधिज्ञ श्री. आर. आर. चौधरी व आरोपींचे विद्वान विधिज्ञ श्री. डी. पी. मापारी यांचा युक्तीवाद ऐकला.

**९.** सरकारी व आरोपींच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद विचारात घेतल्या नंतर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील कारणांसह नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन मुद्दे</u>**

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | सरकारी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, फिर्यादीचे आरोपी क्र.१ सोबत लग्न झाल्या नंतर पासून ते फिर्याद दाखल केल्याच्या तारखे पर्यन्त, फिर्यादीचे नांदत्या घरी आपसात संगनमत करुन, फिर्यादीस आरोपीला नोकरीला लावण्यासाठी माहेरवरुन रुपये २,००,०००/– ची मागणी केली आणि तिचा शारिरीक व मानसिक छळ केला, आणि त्याद्वारे कलम ४९८–अ सह कलम ३४ भा. द. वि. अन्वये गुन्हा केला? | .. नाही. |
| २) | सरकारी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमूद कालावधी मध्ये आणि नमूद ठिकाणी, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला मारहान केली आणि त्याद्वारे भा. दं. वि. कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा | .. नाही. |

| | | |
|---|---|---|
| | केला? | |
| ३) | सरकारी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमूद कालावधी मध्ये आणि नमूद ठिकाणी, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले आणि त्याद्वारे भा. दं. वि. कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | .. नाही. |
| ४) | सरकारी पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमूद कालावधी मध्ये आणि नमूद ठिकाणी, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली आणि त्याद्वारे भा. दं. वि. कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | .. नाही. |
| ५) | अंतिम आदेश काय आहे | .. आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ४ करिता :-**

**१०.** मुद्दे क्र. १ ते ४ हे परस्परांशी संलग्न असल्यामुळे पुरावा आणि कारण मीमांसा यांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने एकत्रितपणे चर्चेकरिता घेतले आहेत. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द करण्याकरीता फिर्यादी वैशाली भागवत हाडे (सा.क्र.१–नि.क्र.५९), प्रकाश त्र्यंबकराव पोफळे (सा.क्र.२–नि.क्र.७५), सौ. प्रतीभा प्रकाश पोफळे, (सा.क्र.३–नि.क्र.७६) व विशाल प्रकाश पोफळे, (सा.क्र.४–नि.क्र.७७) यांचा पुरावा नोंदवला आहे. याव्यतिरिक्त अभियोग पक्षातर्फे अन्य कोणताही पुरावा नोंदवलेला नाही.

**११.** फिर्यादी वैशाली भागवत हाडे (सा.क्र.१) हिने तिच्या पुराव्यात असे सांगितले की, आरोपी क्र.१ तिचा पती आहे. आरोपी क्र.२ व ३ हे तिचे सासरे व सासु आहेत. आरोपी क्र. ४ ते ७ तिच्या नंणदा आहेत. फिर्यादीचे लग्न दिनांक ११/०४/२०१२ रोजी झाले

होते. त्यानंतर ती आरोपींच्या घरी नांदायला गेली. सदर लग्न संबंधातुन तिला एक मुलगा आहे. मुलगा झाल्यानंतर आरोपी क्र.१ ने फिर्यादीला मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपी क्र.१ तिला म्हणायचा की, '' तु दिसायला सुंदर नाहीस, मला दुसरे लग्न करायचे आहे, तु तुझ्या वडीलाकडुन रुपये दोन लाख घेऊन ये व मला दे ''. आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.४ ते ७ चे ऐकुण फिर्यादीला त्रास देत असे. फिर्यादीला तिच्या आई वडीलाकडे जाऊ देत नसत व मुलाला सुध्दा तिच्यापासुन दुर ठेवत. त्यामळे फिर्यादी तिच्या भावासोबत माहेरी निघुन गेली. आरोपी क्र. २ व ३ फिर्यादीला म्हणायचे की, ''आरोपी क्र.१ ला दुसरे लग्न करु दे आणि तु त्यांची सेवा करण्यासाठी इथेच रहा ''. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन लोणार येथे निशाणी क्र.३० वर फिर्याद व निशाणी क्र. ६१ वर प्रथम खबरी अहवाल दाखल केला. फिर्याद व प्रथम खबरी अहवाल यातील मजकुर बरोबर असल्याचे तिने कथन केले आहे.

**१२.** आरोपींतर्फे फिर्यादीचा उलट तपास घेतला असता, त्यामध्ये तिने हे मान्य केले आहे की, तिच्या आई वडीलांचे व आरोपी क्र. १ च्या आई वडीलांचे शेजारी असल्यामुळे सलोख्याचे व मैत्रीचे संबंध होते. सर्वाच्या संमीतीने त्यांचे लग्न लावुन दिले. आरोपीचे शारा येथे वडीलोपार्जीत घर आहे व २० ते २२ एकर कोरडवाहु जमीन आहे. तिने पुढे असे सुध्दा मान्य केले आहे की, तिचे वडील सचिव असलेल्या संस्थेमार्फत चालणारी वेणी येथील शाळेवर आरोपी क्र.१ ने शिक्षक म्हणुन साडे पाच वर्षे नोकरी केली. तसेच आरोपींनी तिला सुरुवातीचे दोन वर्ष चांगले नांदविले. आरोपी तिला लहान सहान गोष्टीवरुन अपशब्द बोलत असत. आरोपी तिला म्हणायचे, तु दिसायला चांगली नाही, तुला स्वयंपायक निट येत नाही, तुझ्या बापाने हुंडा कमी दिला, हीची फारकत घ्या. आरोपींनी तिच्याकडे २,००,०००/– रुपयांची मागणी केली. आरोपी तिला म्हणत होते, तुझ्या वडीलांना सांग माझ्या नव–याला नोकरीला लावुन द्या. आरोपींनी तिच्याकडे दोन लाख रुपयाची मागणी केली व त्या मागणीसाठी तिचा शारिरिक व मानसिक छळ केला. तिचे वडील पैसे देऊ शकले नाही म्हणुन तिला शिवागाळ करुन चापटा बुकयानी मारहाण केली. आरोपींनी तिच्या अंगावरील सोन्या चांदीचे दागीने काढुन घेतले. आरोपी क्र.१ ने तिला 'तु आमच्या घरात राहायचे नाही, तुला जिव मारतो अशी धमकी दिली. या सर्व बाबी तिने नाकारल्या आहेत.

**१३.** अभियोग पक्षाचे साक्षीदार, सा. क्र.२ व ३ हे फिर्यादीचे वडील व आई आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्या मध्ये असे सांगितले आहे की, फिर्यादी त्यांची मुलगी असुन ती सध्या त्यांच्या घरी आहे. फिर्यादीचे व आरोपी क्र. १ चे घरघुती कारणावरुन वाद झाल्यामुळे फिर्यादीने रागाच्या भरात आरोपींविरुध्द फिर्याद दिली होती. या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारले असता त्यांनी अभियोग पक्षाचा संपूर्ण जबाब नाकारला असुन त्यांचे व आरोपींचे न्यायालयाबाहेर आपसात झाले असुन त्यांची आरोपींबद्दल काहीही तक्रार राहिलेली नाही. असे कथन केलेले आहे.

**१४.** अभियोग पक्षाचे साक्षीदार, सा. क्र. ४ हा फिर्यादीचा भाउे आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्या मध्ये असे सांगितले आहे की, फिर्यादी त्याची बहीण असुन ती सध्या त्यांच्या घरी आहे. फिर्यादीचे व आरोपी क्र. १ चे घरघुती कारणावरुन वाद झाल्यामुळे फिर्यादीने रागाच्या भरात आरोपींविरुध्द फिर्याद दिली होती. या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारले असता त्यांनी अभियोग पक्षाचा संपूर्ण जबाब नाकारला असुन त्यांचे व आरोपींचे न्यायालयाबाहेर आपसात झाले असुन त्यांची आरोपींबद्दल काहीही तक्रार राहिलेली नाही. असे कथन केलेले आहे.

**१५.** अभियोग पक्षाने आरोपींविरुद्ध असलेला दोषारोप सिद्ध करण्यासाठी फिर्यादी तथा सा.क्र. १ हिला आरोपींनी पैशाच्या गैरकायदेशीर मागणीवरून क्रुर वागणूक दिली किंवा तिचा शारीरिक व मानसिक छळ केला ही बाब सिद्ध करणे गरजेचे होते. पण फिर्यादी सा.क्र.१ हिने आरोपींनी तिचा शारीरिक व मानसिक छळ कशा प्रकारे केला याबाबत पुराव्यामध्ये काहीही सांगीतले नाही. त्याचबरोबर तिला आरोपींनी कोणत्या तारेखला पैसे मागितले याबद्दल देखील तिने तिच्या पुराव्यामध्ये काहीही कथन केलेले नाही. त्याचबरोबर तिला किती तारेखेला जिवे मारण्याची धमकी दिली. याबद्दल देखील तिने तिच्या पुराव्यामध्ये काहीही कथन केलेले नाही.

**१६.** तसेच साक्षीदार क्र. २ ते ४ यांनी सुद्धा अभियोग पक्षाच्या खटल्याला पुष्टी देण्याईतपत पुरावा दिलेला नाही. आरोपींनी फिर्यादीला शिविगाळ केली अथवा तिच्याकडे पैशाची मागणी करून तिचा शारीरिक व मानसिक छळ केला तसेच तिला जीवे मारण्याची धमकी दिली, याबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. म्हणून सा.क्र. २ ते ४

यांच्या साक्षपुराव्यावरुन आरोपींनी सा.क्र.१ हिचा पैशाच्या कारणावरून शारीरिक व मानसिक छळ केला तसेच तिला जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी सिद्ध झाल्या नाहीत. सबब मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदवले आहे.

**मुद्दा क्रमांक ५ करिता :–**

**१७.** माझे मुद्दे क्रमांक १ ते ४ चे वरील नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता, अभियोगपक्ष आरोपींवरील दोषांकित गुन्हा सिध्द करण्यास असमर्थ ठरल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. त्यामुळे मी मुद्दा क्र. ५ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १) | आरोपी क्र. (१) भागवत रामकृष्ण हाडे, (२) रामकृष्ण उर्फ रामकिसन हाडे (३) सौ. राधाबाई रामकृष्ण हाडे, (४) भक्ती उर्फ संगीता रामकृष्ण हाडे, (५) सौ. ज्ञानेश्वरी देवीदास शिंदे, (६) सौ. गीता पुरुषोत्तम बोंडे व (३) सौ. मुक्ता राम गारोळे यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये, भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २) | आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३) | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये अपील कालावधीपर्यंत रु.२५,०००/– प्रत्येकी चा जामीन व वैयक्तीक जातमुचलका द्यावा. |

स्वा/–

**दिनांक.११/०३/२०२६** **(आर.बी.हनवते)**

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, लोणार

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are correct word to word as per the original.

Name of Court : Shri. R.B. Hanwate
Judicial Magistrate First Class, Lonar.

Name of Steno : Gajanan Ramdhan Ingle
Stenographer, Grade - 3, Lonar.

Date : 11/03/2026.